श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## •मासिक•

वर्ष २० ] जानेवारी, फेब्रुवारी, मार्च १९४३ [ अंक १-२-३

बाबा बाबा, निशिदिनि मना बोल रे बोल बाबा ।।
बाबा नामीं कितितरी असे दिव्य जादू अबाधी ।।



बा बाळिस्य त्यज चरण, जा त्या न भूपा नबाबा ।।
बा बाधा ना, तुज यमगृहीं जावयाची जबाबा ।।

नलिनदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ।।
क्षणमपि सज्जनसंगतिरेका भवति भवार्णवतरणे नौका ।। १ ।।

२६-३-४३ —शंकराचार्य

संपादकः—श्रीधर नारायण खारकर

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ ह. भ. प. दासगणूमहाराजांचा तिळगूळ | १ |
| २ संतांचें माहात्म्य | २ |
| ३ श्रीगुरु गोविंद महाराजांचे श्री साईबाबा संबंधानें उद्गार | ३ |
| ४ श्री साईलीला साडेसाती | ४ |
| ५ श्री साईभक्तांस विनंति | ६ |
| ६ श्री साईबाबानीं दक्षिणायणांत समाधी कां घेतली ? | ७ |
| ७ श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटीच्या सभेचा अहवाल | १७ |
| ८ शिरडी वृत्त डिसेंबर १९४२ | २० |
| ९ अनुभव | २२,२३ व २५ |
| १० शिरडी वृत्त जानेवारी व फेब्रुआरी १९४३ | २४ व २६ |


---

## SUMMARY OF CONTENTS


| Subjects | Pages |
|---|---|
| 1 Shri Sai Baba's Charters and promises | 29 |
| 2 Experiences | 30-31 and 47-48 |
| 3 Visit to Shridi | 32-34 |
| 4 Sai Sudha and Sai Leela | 34-35 |
| 5 Shri Sai Baba and His teachings | 36-37 |
| 6 Shirdi Sansthan of Sai Baba and its working | 37-39 |
| 7 General informations for Devotees | 39-41 |
| 8 Important correspondence from Devotees | 42-47 |
| 9 Acknowledgements | 43 |


---

# श्री साईलीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्योः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ।
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्या निशजानितमहे शीलधिक्षेत्रधिम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साईनाथाः ॥


वर्ष २० } जा. फे. मार्च १९४३ { अंक १-२-३


## अखिल साई भक्तवृंद यांस

॥ श्लोक ॥ ( इंद्रवज्रा )

हा धाडिलेला तिळगूळ सेवा ।
परस्परी लोभ विशेष ठेवा ॥
एकी असे जी बहु सौख्यकारी ।
राखा तिला यत्न करून भारी ॥ १ ॥

॥ पृथ्वी ॥

दिसे पुढिल काळ हा बहु कठीण याचा करा
विचार, निजमानसीं म्हणुन ईश्वराला स्मरा ॥
तयाविण न तारिता कुणिच संकटीं भूवरी
निरालसपणें स्मरा सदय त्यास अत्यादरीं ॥ २ ॥

सकल संतांचा चरणरज

दासगणू

# संत.

संत महात्म्यांच्या लीला जीवांना कौतुकास्पद वाटतात व त्यांचीं सहज लक्षणें मुमुक्षु जीवांना उपदेशरूप होतात. त्यांच्या दर्शनानें मनाचे मळ धुऊन जाऊन देव हवासा वाटूं लागतो व देवाचें प्रेम जडतें. अशा रीतीनें संत महात्म्यांचें नुसतें अस्तित्वही जीवांच्या उद्धाराला कारणीभूत होतें. सर्वच संत उपदेश करून सांप्रदाय किंवा ग्रंथरचना करितात असें नाहीं; कोणी तसें करितात कोणी करीत नाहींत, तरी जगाच्या उद्धारगतीला दोघेही सारखेच कारणीभूत होतात यांत शंका नाहीं. श्रीएकनाथ महाराजांनीं संतांचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे:—

**ते चैतन्याचे अलंकार । कीं ब्रह्मविद्येचें शृंगार ।**
**कीं ईश्वराचे मनोहर । निजमंदिर निवासा ॥ १ ॥**
**कीं ते भूतदयार्णव । कीं माहेरा आली कणव ।**
**ना ते निर्गुणाचे अवेव । निज गौरव स्वानंदा ॥ २ ॥**
**ते पाहती जयांकडे । त्यांचे उगवे भवसांकडे ।**
**परब्रह्म डोळियांपुढें । निज निवाडें उल्हासे ॥ ३ ॥**

देहबुद्धिराहित्य, आत्मनिष्ठा, सदाचार, भूतदया व स्वानंदमग्नता हेंच सर्व संतांचें संक्षिप्त चरित्र. तात्पर्य एकच निर्गुण निराकार देवाच्या संत ह्या सगुण साकार मूर्ति असोन जीवांना देवापेक्षांही जवळच्या वाटतात व अमळ अधिकच प्रिय असतात, बाकी दोघे अंतर प्रीतीनें एकरूपच आहेत. देव ते संत, संत ते देव.

ते दृष्टिआड झाले तरी चारित्र्यानें सर्वांसमोर व भक्तांना सन्निध असतात. भक्तांच्या भक्तीनें मारलेले हांकेस ते सर्वत्र हजर असतात, त्यांना भक्तीचें अंतःकरण पाहिजे असतें.

ज्या वेळीं ते देह पंचत्वाला अर्पण करितात त्या वेळीं सूक्ष्म देहांत प्रभुप्रेमचिंतन सेवेचें ते कार्य करीत असल्यामुळें तेथील वातावरणहि हरिरूपानें भरलेलें असतें आणि म्हणूनच महात्म्यांचीं स्थानें प्रसादरूप असतात.

श्रीज्ञानेश्वर महाराज यांचे समाधींतून आज दृष्टांत होतात व भागवतोत्तमांना दर्शन घडतें. तद्वतच श्रीसाई बाबा समाधी—दर्शनानें आज शेकडों भक्तांस अनुभव देत आहेत.

# श्रीगुरु गोविंद महाराज

## संस्थान आनंदवन, सोनगीर, जि. प. खानदेश

## यांचे चरित्रांतील उतारा.

एके वेळीं श्रीगुरु गोविंद महाराज आजारी होऊन त्यांचे आंगांत जोराचा ताप आहे असें जवळचे मंडळीनें पाहून ती सर्व चिंताक्रांत झाली. त्यांना असें वाटूं लागलें कीं, महाराज यांतच समाधिस्थ होणार व अशा भावना—काहुरानें सर्वच गोंधळून गेले. त्यांची सर्वांची अशी वृत्ती पाहून स्वतः श्रीगुरु गोविंद महाराज इतका ताप अंगांत असतांहि म्हणाले, " तीन महात्मे है, एक ज्योति चंद्रमें मील जायेंगी, बजरंग हमकू कहता है कि तुम ह्यां रहो." महाराजांच्या या आश्वासनामुळें व उद्गारामुळें प्रथम जवळील मंडळीस धीर आला. नंतर एकानें विचारलें, बाकीचे महात्मे कोठें आहेत ? तेव्हां महाराजांनीं आपण शिर्डीचे श्री साईबाबा महाराजांच्या-बद्दल उद्गार काढीत आहोंत असें दर्शविलें. हा प्रत्यक्ष बोध महाराजांच्या सांगण्या-वरून झाल्यामुळें रा. मदन पाटील यांचे हस्तें श्रीगुरु गोविंद महाजांचा संदेश सगळीकडे पाठविला. " श्री साईबाबा महाराजांच्या दर्शनाचा हा शेवटचा लाभ आहे. तरी बाबांच्या बालकांनीं व इतर शिष्यवृंदांनीं बाबांजवळ राहून दर्शनाचा लाभ घ्यावा " असें अगोदर त्यांनीं सर्वांना पत्रद्वारें कळविलें. महाराज म्हणाले, " उसके बालककू हजर रहनेकुं कहो." नंतर दोनतीन दिवसांतच धुळें येथील साठे वकील यांचे कडे साईबाबा समाधिस्थ झाल्याबद्दलची तार आली. त्याच सुमा-रास दिवसा तीन वाजतां दसऱ्याचे दिवशीं, श्रीगुरु गोविंद महाराजांनीं आपल्या जवळील एका सेवकास " न्हाके आव " अशी आज्ञा केली; व त्यास आपले दंड्यावर ओंजळीनें पाणी ओतण्यास सांगितलें व म्हणाले, " चंद्रमें ज्योति मिल गयी " नंतर श्रींनीं केशवदत्त महाराजास " चंद्रके स्थानपर जाके आना." अशी आज्ञा केली.

---

# श्री साईलीला साडेसाती

मृत्युलोकांत जन्म घेतलेल्या यच्चयावत्, सचेतन, अचेतन, चर, अचर, स्थावर, जंगम, वस्तूस शनिराजांची साडेसाती असते. साडेसाती म्हणजे साडेसात वर्षें वक्र दृष्टि. पण या वक्रदृष्ट्यंतर्गत शुभ दृष्टिहि असते. साडेसाती असणाऱ्या वस्तूस ती शुभ अशुभ प्रकारांनीं साडेसात वर्षें भोगावी लागते. शुभ अल्पांना, पण अशुभच बहुतांना. सत्यलोकांपासून नागलोकांपर्यंत, ब्रह्मदेवासारख्या महनीय विभूतीपासून, अविभज्य अलिप्य परमाणूपर्यंतच्या अखिल वस्तूस ही छळते. तिचा फेरा दर तीस वर्षांनीं एकदां येतो व साडेसात वर्षें राहतो. या अवधींत ह्या अक्का कित्येकांना धुळीस मिळवतात. कित्येकांना हालअपेष्टा भोगावयास लावून दांतीं तृण धरून बसावयास लावतात. व कित्येकांना उन्नतपदारोपणास नेऊन पोंचवितात.

आमच्या श्री साईलीलामाईची मधली स्थिति आहे. त्यांचा जन्म शके १८४५ च्या मंगल चैत्र मासांत झाला. त्यांना नुकतेंच आतां कोठें २० वें वर्ष लागलें आहे. पण इतक्या अवधींत त्या एकदां दोनदां साडेसातीच्या चक्रांत सांपडल्या. त्यामुळें, रजनिनाथाच्या आड अभ्र आलें म्हणजे त्यास जसें कांहीं काल दडून बसावें लागतें, तसेंच त्यांना हीं वर्षें व मधून मधून कांहीं कांहीं महिने दडून राहणें भाग पडलें. त्यांचें दर्शन नियमितपणें होईनासें झालें. साहजिकच त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या मुमुक्षुजनांची त्यांचेवर इतराजी झाली. त्यांचे पूर्वींचे व हल्लींचे संपादक व संचालक बाबांचे उत्साही, प्रेमळ व कळकळीचे भक्त. पण किती झाले तरी ते संसारी. व श्री साईलीलामाईंना सुंदर वेष चढवून नटविणारे मुद्रक व प्रकाशक व्यापारी दृष्टीचे. त्यांना स्वार्थाची हाव व सर्वांची भीड. शिवाय रुचिभिन्नत्वाला, वृथाभिमानाला व प्रकृति अस्वास्थ्याला कोण बळी पडत नाहीं? पण या सर्वांचा परिणाम त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या मुमुक्षुगणांवर पुन्हा अनिष्ट होत चालला. मुमुक्षुवृंद घटत घटत ९०० चा ३०० वर आला व आतां तर ३०० चा १०० वरच आला. संपादक व संचालक, श्रीसाईलीलामाईचें दर्शन आतां नियमितपणें होत जाईल, अशीं शून्यगर्भ आश्वासनें देतच होते. पण वर्गणीदार मुमुक्षुसंघांनीं तीं कां व किती मुदत मानावींत? मानूं नयेत असेंच कोणीही म्हणणार. व आतांपर्यंत १०० नीं तरी मानली हेंच महद्भाग्य.

प्रत्येक गोष्टीस दोन बाजू असतात. पैकीं एक झाली, आतां दुसरी.

पण कांहीं झालें तरी श्रीसाईलीलामाई ह्या बाबांचें प्रिय व लाडकें अपत्य. बाबांची व बाबांच्या संस्थानची प्रत्येक बारीकसारीक वार्ता, बाबांच्या भक्तजनांना

व इतर जगाला कळविण्याकरतांच तर त्यांचा जन्म. त्यांचेवांचून हें कार्य करणार कोण ? नियमितपणें वा अनियमितपणें हें कार्य त्याच करीत राहणार. या कामावर बाबांनींच त्यांची योजना केली आहे. त्या अखंडायुषी होवोत असाच बाबांचा त्यांना शुभाशिर्वाद आहे. व म्हणूनच विलंबानें किंवा अविलंबानें त्यांचें पवित्र दर्शन होत असतें. पण तें सदैव नियमितपणें होत राहिलें पाहिजे अशीच संस्थान कमिटीच्या सर्व सभासदांची बलवत्तर सदिच्छा व सदाशा आहे.

आमच्या श्रीसाईलीलामाई हल्लीं नवयौवनाच्या भरांत आल्या आहेत. पण त्यांच्या तारुण्याचें, लावण्याचें व कर्तृत्वाचें तेज जगांतील अखिल मुमुक्षुजनांवर पाडण्याचें व त्यांच्या अवतारकार्याचें व हेतूचें योग्य साफल्य करण्याची जबाबदारी मुख्यत्वेंकरून त्यांच्या प्रशस्त प्रोत्साही व प्रबुद्ध संपादकांच्या व संचालकांच्या नियमितपणावर व प्रगल्भ विचारावर अवलंबून आहे.

श्रीमाईबाई अपत्य आहेत. बाबांचें अपत्य आहेत. बाबांना प्रिय व गोड आहेत. त्यांच्याच अनुज्ञेनें त्या भक्तजनांची वेडीवांकडी सेवा करीत आहेत. त्यांना एखादे वेळीं थोडेसे मांद्य किंवा अस्वास्थ्य उत्पन्न झालें तर भक्तगणांनीं त्याचा राग न मानतां संपादकमहाशयास त्याची जाणीव करून देऊन कार्यक्षम करावें व माईबाई-वर अनुरागच करावा. व त्यांना संभाळून घ्यावें.

हें अपत्य इतर नियतकालिकेसारखें नाहीं. थोरा-मोठ्याचें आहे. त्यांचें दर्शन बाबांच्या पुण्य प्रेरणेनें जसें सुलभ होतें, तसेंच त्यांचे पुण्य प्रेरणेनें मधून मधून कांहीं काल त्यांचें दर्शन दुर्लभही पण होतें. याचें कारण बाबानांच माहीत. तथापि दर्शनांत खंड पडला म्हणजे उत्कंठा वाढते, प्रेम दुणावतें व बाबांच्या अतर्क्य लीलेचें कौतुक चतुर्गुण होतें ! असो.

श्रीसाईलीलामाईच्या दर्शनापासून व्यक्तिशः संपादकांस, संचालकांस किंवा संस्थान कमिटीच्या सभासदांस, व्यावहारिक स्वार्थदृष्टीनें पैची ही अपेक्षा नाहीं. फक्त त्यांच्या निर्वाहापुरतें द्रव्य भक्तजन वर्गणीदारांकडून मिळालें म्हणजे पुरे आहे. खर्चवेंच जाऊन जास्त राहिलेंच तर तें संस्थान निधींतच पडणार.

हल्लीं संस्थान कमिटीच्या आज्ञेप्रमाणें संपादकांची व संचालकांची नवी योजना झाली आहे. श्रीलीलामाईची साडेसाती आतां संपली आहे. आतां त्या मुमुक्षु भक्तवृंदांना शके १८६५ साल संपेपर्यंत तूर्त तरी दर तीन तीन महिन्यांनीं एकदां पण नियमितपणें दर्शन देतील. व भक्तगणांची व बाबांची अचूक सेवा करतील अशी बलवत्तर आशा आहे.

भक्तवृंदांनींही त्यांच्याकडे आपुलकीच्या भावानें पाहून आतांपर्यंत झालेल्या अनियमितपणाबद्दल क्षमा करून त्या करीत असलेल्या पवित्र व निष्काम कार्यावर लक्ष देऊन प्रोत्साहनार्थ हल्लीं वर्गणीदार भक्तसंख्यांत जी अत्यंत शोचनीय घट पडली आहे ती काढून टाकून जास्त वर्गणीदार मिळवून देण्याचा हस्तें परहस्तें भगीरथ प्रयत्न करण्याची कृपा करावी अशी त्यांना सप्रेम व नम्र प्रार्थना आहे.

गुरुवार मिती माघ शु. १०
दिनांक ११-२-४३ ठाणें. } बाबांचें बाळ

---

## श्री साईभक्तांस विनंति

साईलीलेचें वर्ष जानेवारी महिन्यापासून सुरू होते. तरी अंक सुरू करणें झाल्यास जानेवारीपासून वर्गणीदार झालें पाहिजे. नवीन वर्गणीदारांनीं वार्षिक वर्गणी ट. खर्चासह ३-८-० मनिऑर्डरीनें पाठवावी.

भक्तांनीं आपले अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपा करून खालील पत्त्यावर पाठवावेत. आपलें नांव प्रसिद्ध होणें नको असेल त्यांनीं आपलें टोपण नांव कळवावें त्याप्रमाणें दिलें जाईल. परंतु आपलें नांव व पत्ता संपूर्ण कळविला पाहिजे.

चालू जागतिक परिस्थितिनुरूप तूर्त मासिकाचे त्रैमासिक जोड अंक निघतील. फुटकळ त्रैमासिक जोड अंकाची किंमत रु. १ पडेल. व्ही. पी. केली जाणार नाहीं.

पुष्कळ भक्तमंडळींच्या पत्त्यांत फेरफार झाल्यामुळें त्यांना पोष्टांतून पाठविलेल्या उत्सवाच्या निमंत्रण-पत्रिका व प्रसाद न पोंचतां परत येतात. तरी कृपा करून त्यांनीं आपले पत्ते बदलले असल्यास ऑ. चिटणीस रा. रा. श्री. ना. खारकर, ३७ चराई रोड, ठाणें यांजकडे कळवावें.

**श्रीधर नारायण खारकर**
ऑ. चिटणीस शि. संस्थान, ३७ चराई रोड, ठाणा.

---

श्रीदत्तचित्साइसद्‌गुरुभ्योनमः

# बाबा व ज्ञानेश्वरी

## बाबांनीं दक्षिणायनांत प्राणप्रयाण कां केलें किंवा समाधि कां घेतली?

**उपजें तें नाशें । नाशलें पुनरपि दिसे ॥**
**हें घटिकायंत्र तैसें । परिभ्रमे गा ॥ १५९ ॥**
**ना तरी उदो अस्तु अपैसे । अखंडित होत जात जैसें ॥**
**हें जन्म मरण तैसें । अनिवार जगीं ॥ १६० ॥**

श्री. ज्ञा. अ. २ श्लो. २७ भाष्य

प्रत्येक जन्मलेल्या प्राण्यास मृत्यु हा आहेच. पण मृत्यूनंतर तो कोठें जातो, म्हणजे स्वर्ग लोकांत, चंद्रादि इतर लोकांत, ब्रह्मपदीं किंवा मृत्युलोकावरच जन्म घेतो हें जाणण्याची जिज्ञासा प्रत्येक मानव प्राण्यास असते व तो कोणते ठिकाणीं जन्मास गेला हें ओळखण्याची एक साधारण, तार्किक किंवा अनुमानिक किंवा ढोबळ खूण ही त्यानें मानलेली दिसते. आणि त्यावरूनच लोकांत नेहमीं अशी एक म्हणण्याची चाल पडलेली आहे कीं, मानव प्राणीच काय पण पशुपक्षी, जलचरें, कीटक, कृमि वगैरे जीवजंतू पैकीं कोणत्याही प्राण्याचा अगर जीवजंतूचा प्रयाणकाळ (मरणकाल) किंवा समाधिकाल जर एकादशीस आला तर तो जीव वैकुंठास (विष्णु लोकास) जातो. महाशिवरात्रीस आला तर तो कैलासास (शिव लोकास) जातो. त्याच प्रमाणें त्याचा मृत्यु जर इतर कोणत्याही गुरुवार शुक्रवारादि शुभवारीं, पाडवा, दसरा, अक्षयतृतीया, बलिप्रतिपदासारख्या साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एखादे शुभ मुहूर्तीं, महोदय, कपिलाषष्ठी वगैरे सारख्या एखादे शुभपर्वणीवर, अमृतसिद्धिसारख्या एखादे शुभ योगावर किंवा काशी, प्रयाग, पंढरपूरसारख्या एखादे पुण्य क्षेत्रीं, झाला तर तो जीव स्वर्ग चंद्र सूर्यादि लोकावर जातो. व एखादे कुमुहूर्तावर किंवा कुयोगावर झाला तर तो जीव नरक लोकास जातो.

पण अशीं अनुमानें काढण्यास किंवा खूण मानण्यास कांहीं तरी कारण असलेंच पाहिजे.

**भगवान श्रीकृष्ण भगवद्गीतेंत सांगतात—**

श्री. ज्ञा. अ. ९ श्लो. २५

मन वाचादि सर्व इंद्रियें करून जे भक्त एकनिष्ठपणें देवाचें भजन-पूजन करून त्याचे ठिकाणीं निरंतर श्रद्धा व लक्ष ठेवतात ते देहविसर्जन झाल्याबरोबर

देवच होतात म्हणजे देवलोकास ( स्वर्गलोकास ) जातात. एकनिष्ठपणें पितरांचीं व्रतें, भजन-पूजन करून त्यांचे ठिकाणींच जे भक्त आपलें चित्त अर्पण करतात ते त्यांची इहलोकोची जीवित यात्रा संपल्याबरोबर पितर लोकास जातात किंवा भूत पिशाचादि क्षुद्र देवतांचे ठिकाणींच जे एकनिष्ठपणें भक्ति करतात व जारण मारण उच्चाटणादि मंत्रांनीं त्यांची उपासना करतात ते भक्त त्यांच्या शरीरघाताबरोबर पिशाच्च योनींत जन्म घेतात. या प्रमाणें ज्यांचा जसा संकल्प, जशी श्रद्धा, जशी भक्ति व जशी उपासना त्याप्रमाणें त्यांना तो लोक किंवा ती योनी प्राप्त होते. तसेंच माझ्या सर्वव्यापी निर्गुण परमात्याचे ठिकाणीं ज्यांनीं एकनिष्ठपणें सर्व इंद्रियें व अवयवासह श्रद्धा ठेवून माझी उपासना करून सर्वस्व मला अर्पण केलें ते भक्त जिवंत असतांच मत्स्वरूपीं येऊन मिळतात. मग त्यांच्या कायानाशानंतर ते कोठें जाणार ? अर्थात् माझ्या ब्रह्मपदींच लीन होतात. हे सिद्धांत सत्य आहेत व सर्व जीवास लागू पडणारें आहेत. वरील श्लोकावरील श्रीज्ञानेश्वरांच्या ओव्या ३५५ ते ३६५ पहा.

पण हे भक्त त्या त्या योनींस, लोकास किंवा पदास गेले याच्या निश्चित खुणा काय ?

मला वाटतें त्या वरील श्लोकभाष्यांत दिलेल्या नाहींत. हें केवळ अनुमानानें समजावयाचें. पण इतरत्र तरी अशा खुणा कोठें दिल्या आहेत का ? व दिल्या असल्यास कोणत्या जिवाकरतां ?

म्हणून कालशुद्धीवर जर देह ठेवला तर देह ठेवतांक्षणींच तो जीव ब्रह्मरूप होतो, व अशुद्धकालीं जर देह ठेवला तर तो प्राणी पुन्हां संसारांत येतो म्हणजे जन्म घेतो.

प्रयाणकालाच्या या शुद्धाशुद्ध कालासच शुक्ल व कृष्ण गति किंवा मार्ग म्हणतात. पहिला मार्ग प्रकाशमय व दुसरा अंधःकारमय जगताच्या ह्या अशा दोन शाश्वत गति म्हणजे कायमचे मार्ग जीवाच्या प्रयाण कालावरून मानिले आहेत. पहिल्या म्हणजे शुक्ल मार्गांत सांगितलेल्या योगावर जर जिवाचें प्राणप्रयाण झालें तर तो जीव परत फिरत नाहीं, म्हणजे ब्रह्मस्वरूपासच पोंचतो. व दुसऱ्या म्हणजे कृष्ण मार्गांत सांगितलेल्या योगकालीं जर प्राण्याचें प्राणप्रयाण झालें तर तो प्राणी ब्रह्मपदास न पोंचतां पुन्हा कोणत्या तरी लोकावर जन्मास येतो. पण प्रत्येक जिवास वरील दोन गतीपैकीं हटकून अमुकच गति प्राप्त होईल हें निश्चित सांगतां येणार नाहीं. देहांताचे वेळीं त्या जिवाच्या दैवयोगाप्रमाणें म्हणजे त्यानें जसें व जितकें शुभाशुभ कर्म केलें असेल त्याप्रमाणें त्याला शुक्ल किंवा कृष्ण गति प्राप्त होते.

श्रीमद्भगवद्गीता अ. ८ श्लो. २३ व २६ वरील श्री ज्ञा. भा. ओ. २०६–२३८–२४६.

ह्या प्रयाणकालाच्या गतींना आणखी दुसरीं नांवें आहेत कीं काय हें आपण पाहूं.

पहिल्या म्हणजे शुक्ल गतीस उत्तम मार्ग, उजू मार्ग, शुद्ध मार्ग व अर्चिरादि मार्ग अशीं नांवें आहेत.

त्याचप्रमाणें दुसऱ्या म्हणजे कृष्ण गतीस अव्हाट मार्ग, अकाल मार्ग, कृष्ण मार्ग व धूम्रमार्ग अशीं नांवें आहेत.

आतां ह्या वरील दोन मार्गांत प्राणप्रयाणकालीं कांहीं योग (किंवा पायऱ्या) असतात कीं काय व असल्यास कोणते व किती तें आपण पाहूं.

भगवान श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं आपल्या ओजस्वी, रसाळ, मोहक व सुंदर वाणीनें याचें वर्णन केलें आहे, तें मी संक्षिप्त रूपानें येथें देत आहें. ते सद्भक्त वाचकवृंदांनीं मननपूर्वक वाचावें अशी माझी त्यांना नम्रपणाची पण आग्रहाची विनंती आहे.

## उमत्त मार्ग

पहिला **योग** किंवा पायरी:—

शरीराचे **आंत** जो जठराग्नि असतो तो प्राणप्रयाण कालीं प्रदीप्त म्हणजे झगझगीत असला पाहिजे.

दुसरा **योग** किंवा पायरी:—

**तो** अग्नी आंत प्रकाशमय असला पाहिजे.

तिसरा **योग** किंवा पायरी:—

**बाहेर** प्रयाणकालाचें वेळीं दिवस पाहिजे.

चौथा **योग** किंवा पायरी:—

**बाहेर** शुक्लपक्ष म्हणजे पहिला पंधरवडा पाहिजे.

पांचवा **योग** किंवा पायरी:—

**बाहेर** उत्तरायणांतील सहा महिन्यांपैकीं कोणता तरी एक महिना पाहिजे. ही सर्वांत उच्च पायरी. याप्रमाणें सायुज्यसिद्धिसदनास जाण्यास हा पांच पायऱ्यांचा सोपान (जिना–दादर) आहे, यासच अचिरादि मार्ग म्हणतात. श्री. ज्ञा. अ. ८ श्लो. २४ ओ. २२० ते २२५

## अव्हाट मार्ग किंवा अकाल या मार्गांतील अडचणी व संकटें

तरी मरणसमयाचे वेळीं आंत वात, कफ, पित्तादि त्रिदोषांची गर्दी झाली आहे. त्यामुळें अंतःकरणांत जिकडे तिकडे अंधार कोंदून राहिला आहे. सर्व इंद्रियें लांकडाप्रमाणें कडकडीत झालीं आहेत. स्मरणशक्ति भ्रमांत बुडून गेली आहे. मन वेडें झालें आहे. प्राण कोंडला आहे. जठराग्नीचे ठिकाणची दाहकता, प्रखरपण, प्रज्वलता व प्रकाशपण नाहींशीं झालीं आहेत. अग्नी सर्व धूरच होऊन राहिला आहे. त्या धुरानें शरीरांतील चेतना जागच्या जागींच व्यापून कोंडली जाते. जसे चंद्राआड पाण्यानें भरलेले सज्जड ढग आले म्हणजे त्याचा कोंडमारा होतो, व नंतर अंधार ना प्रकाश ( रात्र ना दिवस ) अशी ( संध्याकालप्रमाणें ) मधली ( थोडा अंधार थोडा प्रकाश ) स्थिति होते, तसें ( मरणकालीं त्रिदोष झाला असतांना ) तो पुरुष धड मरतही नाहीं व सावधही रहात नाहीं. याप्रमाणें त्याचे जिवास स्तब्धता प्राप्त होते. व त्याचें आयुष्य मरणाच्या वेळेची वाट पहात असतें. याप्रमाणें मन, बुद्धि व इंद्रियें यांच्या भोंवती धूमव्याकूलतेचें कडें बनलेलें असतें. त्या ठिकाणीं जन्मभर केलेल्या योगाभ्यासाचें युग ( मार्ग ) संपूर्ण बुडून जातें. ( मार्ग बंद होतो. ) अरेरे जन्मांत केलेली योग्याभ्यासाची कमाई जेव्हां हातांतून जाते तेव्हां इतर लाभाची ( आत्मसाक्षात्कारांची ) गोष्ट कशाला विचारावी ? म्हणून प्रयाणकालाचे वेळीं जेव्हां अशी दशा होते, तेव्हां त्या कालासच अव्हाट किंवा अकाल मार्ग म्हणतात.

आतां या मार्गानें पुनरावृत्तीस म्हणजे पुन्हा जन्म घेण्यास जे पांच योग किंवा पांच पायऱ्या लागतात त्या खालीं लिहिल्याप्रमाणें—

पहिला योग किंवा पायरीः—

शरीराचे **आंत** जो जठराग्नि असतो तो त्रिदोष झाल्यामुळें विझतहि नाहीं व प्रज्वलितहि रहात नाहीं. त्यामुळें तो अग्नि, मन, बुद्धि व इंद्रियें हीं नुसत्या त्रिदोषरूपीं धुरानें व्यापलेलीं व कोंडलेलीं असतात.

दुसरा योग किंवा पायरीः—

तो अग्नी प्रकाशमय नसून आंत अंधुक असतो.

तिसरा योग किंवा पायरीः—

**बाहेर** प्रयाणकालाचे वेळीं रात्र असते.

चवथा योग किंवा पायरीः—

**बाहेर** कृष्णपक्ष किंवा दुसरा पंधरवडा असतो.

पांचवा योग किंवा पायरीः—

बाहेर दक्षिणायनांतील सहा महिन्यांपैकीं कोणता तरी एक महिना असतो. ही सर्वांत अत्यंत वाईट पायरी आहे. याप्रमाणें सायुज्यपद, ब्रह्मपद, परमात्मपद खेरीज करून कोणते तरी लोकांवर जन्म घेण्यास अथवा निरस लोकांस जाण्यास हा पांच पायऱ्यांचा सोपान ( जिना—दादर ) आहे.

या मार्गास धूम्र मार्ग असें म्हणतात.

आतां हे वरील दोन मार्ग श्री. ज्ञा. अ. ८ श्लो. २५ वरील २२६ ते २३७ ओंव्या. ( अर्चिरादि मार्ग व धूम्र मार्ग ) व त्यांतील पांच पांच पायऱ्या, योग किंवा खुणा भूत सृष्टींतील यच्चयावत् प्राण्यांकरतां आहेत किंवा कांहीं विवक्षित जीवाकरतांच आहेत, व विवक्षित जीवाकरतांच जर असतील तर ते विवक्षित जीव कोणते हें आपण पाहूं.

उपरिनिर्दिष्ट केल्याप्रमाणें जगतांतील प्रयाणकाल-समयाच्या वेळचे हे दोन कायमचे अनादिसिद्ध सरळ, व आडमार्ग असून त्यांच्या त्या पांच पांच पायऱ्या ह्या अनादिसिद्ध शाश्वत खुणा आहेत. आपल्याच हिताकरतां वरील दोन्ही मार्गांपैकीं खरा कोणता व खोटा कोणता हे शोधून पहावे म्हणजे अनवसरीं ( आडमार्गी किंवा धूम्रमार्गी ) देह पडण्याची पाळी येणार नाहीं. एऱ्हवीं देहाचा अंत समय फार कठीण आहे. त्या वेळीं वरील मार्गांचा भ्रम पडण्याचा संभव असतो व जन्मभर अभ्यासिलेल्या कार्यांचा नाश होतो. जर अर्चिरादि मार्ग चुकला व प्रसंगोपात्त धूम्रमार्गी देह पडला तर तो मुमुक्षुजीव संसार—रहाटास जुंपून ( बैलाप्रमाणें किंवा रेड्याप्रमाणें ) निरंतर फिरतच राहणार. हे प्रयाणकालच्या वेळचे थोर कष्ट पाहून योगेश्वर श्रीकृष्ण प्रभूनीं वरील दोन सुंदर मार्ग शोधून काढिले आहेत.

श्री. ज्ञा. अ. ८ श्लो. २६ ओं. २३८ २३९, व २२२ ते २४५ पहा.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं हे वरील अर्चिरादि व धूम्रमार्ग भूतसृष्टींतील यच्चयावत् जीवाकरितांही नव्हेत व श्री. ज्ञा. अ. ९ श्लो. २६ भाष्यांत सांगितलेल्या चार प्रकारच्या जीवाकरितांही नव्हेत. तसेंच ते सोऽहंसिद्ध, पूर्ण योगी किंवा पूर्ण ज्ञानी जीवाकरतांही नव्हेत. ते मार्ग व त्या खुणा केवळ योगभ्रष्ट योग्याकरतां व योगसाधकाकरतां आहेत. हे खालील श्री. ज्ञा. अ. ८ श्लो. २३ पासून २६ पर्यंतच्या भाष्यांतील योगी व योग या शब्दावरून कळेल.

" तेवींचि आणिकें ही एके प्रकारें । हें जाणतां आहे सोपारें ॥ तरी देह सांडितेनी अवसरें । जेथ मिळती योगी ॥ २०४ ॥ ऐसा जयाचा देह पडे ।

तया **योगी** म्हणोनि चंद्रवरी जाणें पडें ॥ मग तेथूनि मागुता बहुडे । संसारा ये ॥ २३५ ॥ हे सायास देखोनि मोठे । आतां कैसेनि पां एक वेळ फिटे ॥ म्हणोनि **योगमार्गें** गोमटे । शोभिले दोन्ही ॥ २४५ ॥

आतां प्रश्न हा कीं समाधिकालाच्या वेळीं बाबांचा जठराग्नि आंत कायम असून प्रकाशमय होता, बाहेर दिवस असून शुक्लपक्षही होता. पण आश्विन मास हा दक्षिणायनांतील सहा मासापैकीं एक मास होता. म्हणजे ब्रह्मपदां जाण्याकरतां ज्या अर्चिरादि मार्गाच्या साहाय्यानें जावयास पाहिजे होतें, त्या अर्चिरादि मार्गांतील उत्तरायणाच्या सहा मासापैकीं एक मास ही जी एक अत्युच्च पायरी तीच येथें फक्त कमी होती. आश्विन हा महिना दक्षिणायनांतला आहे व दक्षिणायनांत देह ठेवणें म्हणजे धूम्र-मार्गानें जाणें होय. म्हणजे बाबा योगभ्रष्ट किंवा योग साधक होते. त्यांनीं प्रथम योगी म्हणून चंद्रलोकावर जन्म घेतला असला पाहिजे व नंतर कांहीं कालांनीं योग पुरा करण्याकरतां ते मृत्युलोकावर येतील, असें अनुमान निघतें, नव्हे सिद्धांत निघतो. आतां वरील दोन मार्ग त्यांच्या प्रयाणकालच्या खुणा जरी साधकाकरतां किंवा योगभ्रष्टा-करतां सांगितलेल्या आहेत तरी मी अमुकच मार्गानें जाईन अशी त्याची खात्री नसते. प्राणप्रयाण समयीं दैवगत्या किंवा पूर्वकर्मानुसारें ज्याच्या वाटेस जो मार्ग येईल तो खरा, असे वर श्री. ज्ञा. अ. ८ श्लो. २६ चे भाष्यांतील २४६ वें ओंवींत लिहिलें आहे. व यावरून पाहिलें म्हणजे बाबांचें दक्षिणायनांतील प्रयाण साधकाच्या चरित्रापेक्षांही हीन कोटींतील दिसते. तर मग ज्यांना आपणच काय पण सर्व जग त्यांच्या अनंत, अलौकिक, व अगम्य लीलेवरून प्रत्यक्ष सगुण परमात्मा समजतें, दुर्जनांचा संहार करून ( दुष्टकल्पनांचें निर्दालन करून ) साधुसंतांचा प्रतिपाल करण्याकरतांच ज्यांनीं मृत्युलोकावर अवतार धारण केला असें मानतें हें सर्व मिथ्याच कीं काय ? बाबांनीं, भगवान श्रीज्ञानेश्वरमहाराजाप्रमाणें, नास्तिक पण सुशिक्षित लोकांना आणि निर्गुण भक्तीचें व निरीश्वरवादाचें स्तोम माजविणाऱ्या वावदुकांना सगुण भक्तीच्या मार्गाला लावले. लोकमान्यापासून थेट शिर्डीतील वेडसर मानलेल्या श्री म्हाळसा देवी ( म्हाळी ) पर्यंतच्या जीवांना आपल्या अद्वितीय लीलेनें आपल्या विश्वव्यापकत्वाची साक्ष पटवून देऊन त्यांना आपलें वेड लावून ठेवलें, ह्या सर्व डोळ्या-समोरच्या व स्वानुभवाच्या गोष्टी मिथ्याच कीं काय ? द्वारकेहून गिरनार, अबूचा पहाड, माहूर, अक्कलकोट, गाणगापूर, दौलताबाद, पंढरपूर, व शिरडी असा आपला उत्तरेकडून दक्षिणेंत येण्याचा पूर्वीचा मार्ग देऊन, आल्या दिवसापासून समाधिकाला-पर्यंत शिरडींत हंडी किंवा डेगचे निमित्तानें काला स्वतः **सुरू करून पुढेंही काला**

करण्याची प्रथा पाडून ठेविली, अनंत जीवानां शेवटपर्यंत पोंचविणारे आपण शुभ्र ब्राह्मण आहों, व ही मशीद नव्हे,ही द्वारकामाई आहे, ही काळ्या मुसलमानाची मशीद नव्हे ब्राह्मणाची मशीद आहे, येथें मी काळ्या मुसलमानाची साउली पडूं देणार नाहीं; वगैरे वगैरे वाक्यांची गर्जना छातीला हात लावून, उभे राहून आपल्याला सत्य व अमोघ वाणीनें केली व महाराष्ट्रास नव्हे सर्व जगास चकित करून दिपवून सोडणाऱ्या अशा अति प्राचीन अवतारचक्रांतील श्रीकृष्णावताराच्या पवित्र व दिव्य कालांत, शिरडी एके वेळीं दक्षिण द्वारकेचा भाग होता ही गोष्ट नाना प्रकारच्या पौराणिक, ऐतिहासिक, नैसर्गिक व आख्याइका यांच्या प्रत्यक्ष पुराव्यावरून सिद्ध करून देऊन व बुद्धीस पटवून देऊन, प्रत्ययास आणून देऊन रेंटीत खेंचीत नेले या सर्व गोष्टी असत्यच कीं काय? नाहीं. नाहीं. त्रिशुद्धी नाहीं.

बाबा श्रीज्ञानेश्वर महाराजांचे अवतार होते. ते श्री दत्तप्रभु व कृष्णप्रभुही होते. अति सूक्ष्म रीतीनें बाबांच्या चरित्राचें अध्ययन करणारास हें रहस्य कळेल.

बाबांच्या मुखांतून निघालेला काना, मात्रा, बिंदु, विसर्ग, स्वरव्यंजन, हीं अर्थपूर्ण होतीं व आहेत. ज्यांचा प्रत्येक शब्द सत्य, ज्यांचें प्रत्येक वाक्य व मंत्र-वाणी अमोघ, साम्यावस्था, आत्मौपम्य दृष्टी, व्यवहार, लोकसंग्रह, वैराग्य, भिक्षा वगैरे गोष्टी ज्ञानमकरंदांनीं ओथंबलेल्या उदार दशोपनिषत्कमलकुसुमरत्नांपैकीं बृहदारण्यकोपनिषदांतील तृतीयाध्यायाच्या, पंचम ब्राह्मणाच्या पहिले, दुसरे व तिसरे मंत्रांतील ऋषिवर्य कहोल व ब्रह्मनिष्ठ याज्ञवल्क्य यांच्या संवादांतील चार एषणांचा त्याग करून भिक्षाचार्य करणाऱ्या ब्रह्मनिष्ठास तंतोतंत साजेशा अशाच होत्या.

बाबा साधक नव्हते, बाबा योगभ्रष्ट नव्हते. ते सोऽहंसिद्ध होते. ते मुक्त होते, ते पूर्ण ज्ञानी होते, ते पूर्ण योगी होते. ते प्रत्यक्ष सगुण परमात्मा होते. जगति-तलावर विखुरलेल्या अनंत भक्तांना ते अद्यापही आपली परमात्मसत्ता, परमात्मतेज, परमैश्वर्य दृष्टांत व अन्य द्वारें क्षणोक्षणीं पटवून देत आहेत.

मनुस्मृतीच्या खालील श्लोकाप्रमाणें बाबा मुक्त होते असें माझें मत आहे, असें कै. महाभारताचार्य श्री. चिं. वि. ऊर्फ नानासाहेब वैद्य रा. कल्याण यांनीं लिहिलें आहे.

**" कपालं वृक्षमूलंच कुचेलमसहायता ॥**
**सर्वत्र समता दृष्टिरेतन्मुक्तस्य लक्षणम् ॥**

मनुस्मृति, अ. १०

अर्थः—भिक्षा पात्र वा फुटकें खापर, ( हातीं घेऊन भिक्षा मागणें ) ( घर किंवा झोंपडें न करतां ) तरुतलीं किंवा झाडाखालीं किंवा मोडक्यातोडक्या नादुरुस्त बखळ जागेंत किंवा झोंपड्यांत रहाणें. फाटकेंतुटकें मलिन वस्त्र नेसणें. पांघरणें

किंवा वापरणें, अपरालंबित्व ( दुसऱ्यावर केव्हांही व कोठेंहि अवलंबून नसणें किंवा दुसऱ्याची केव्हांही व कोठेंहि मदत न मागणें ) व सर्वत्र ठिकाणीं समता, साम्य, आत्मौपम्य दृष्टि असणें, हीं मुक्ताचीं लक्षणें आहेत.

श्री सा. ली. वर्ष २ रे अंक १० पान २६४

वऱ्हाडांतील प्रख्यात, विद्वद्वर्य कायदेपंडित कै. श्री. दादासाहेब खापर्डे यांनीं बाबा सगुणावतार चालते बोलते परमात्मा होते असें लिहिलें आहे.

रा. ब. प्रधानकृत " साईबाबा ऑफ शिरडी " या इंग्रजी पुस्तकास लिहिलेली प्रस्तावना पहा.

बाबा सिद्ध होते हें सत्य गीतारहस्यांत लोकमान्यांनीं पान ३६४ ते पान ४०३ पर्यंत लिहिलेल्या " सिद्धावस्था व व्यवहार " या १२ वे प्रकरणांत केलेल्या विवेचनावरून तंतोतंत दिसून येईल. ते इच्छाजन्मीं व इच्छामरणीं होते. जन्ममृत्यूवर त्यांचें प्रभुत्व होतें. बाबा जन्म—मृत्यूच्या स्वाधीन नव्हते. लोकमान्य बाबांच्या दर्शनास मुद्दाम शिरडीस आले होते.

यावरून बाबा सिद्ध होते हें सिद्ध झालें. पण त्यांनीं दक्षिणायनांत देह कां ठेवला हें कोडें उलगडत नाहीं. व वर सांगितलेल्या " देवान् देवयजोयांति " या चार प्रकारांत किंवा " अग्निर्ज्योतिरहश्शुक्लः " या दोन मार्गांपैकीं पहिल्या मार्गांत ही त्यांचा प्रयाणकाल येत नाहीं.

ते साधक किंवा योगभ्रष्ट नसल्यामुळें त्यांचा प्रयाणकाल धूम्रमार्गांतही येत नाहीं. मग सिद्धांच्या प्रयाणकालाचे नियम किंवा मार्ग कांहीं निराळे आहेत कीं काय हें पाहिलें पाहिजे.

श्री ज्ञानेश्वरांचा समाधिकाल कार्तिक कृ. १३ शके १२१८ म्हणजे दक्षिणायनांतच आहे.

श्री निवृत्तिनाथ महाराजांचा समाधिकाल ज्येष्ठ कृ. १२ शके १२१९ म्हणजे दक्षिणायनच आहे.

श्री निवृत्तिनाथ महाराज व भगवान श्री ज्ञानेश्वर महाराज हे पूर्ण योगी, ज्ञानी व सिद्ध होते याबद्दल वाद नाहीं. मग त्यांनींही आपला देह दक्षिणायनांत कां ठेवला ? हाही प्रश्नच आहे.

मला वाटतें ही अडचण अगर हा प्रश्न वाटतो तितका अवघड नाहीं.

आत्मज्ञानी सिद्ध पुरुषांच्या व्यवहाराबद्दल व वर्तनाबद्दलचें विवरण कौषीतक्युपनिषदांत उत्तम प्रकारें केलें आहे.

गीतारहस्य प्र. १२ पा. ३६८

" निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ॥ "

जे पुरुष त्रिगुणातीत (सिद्ध, मुक्त) झाले त्यांना विधिनिषेधरूपी किंवा मार्गामार्ग (अर्चिरादिमार्ग) नियम बांधूं शकत नाहींत. (श्रीशंकराचार्य)

शिवाय आपण अध्याय श्री. ज्ञा. अ. ८ श्लो. २७ व २८ यावरील भाष्यार्थांचा व त्यांतील रहस्याचा सूक्ष्म रीतीनें मनन करून नीट विचार केला नाहीं. या दोन्ही श्लोकांतील 'योगी' शब्द म्हणजे पूर्ण योगी पूर्ण ज्ञानी, सोऽहंसिद्ध असा आहे. व अशा अर्थानें दोन्ही श्लोकावरील भाष्य वाचलें म्हणजे ही अडचण दूर होते किंवा हा प्रश्न सुटतो असें मला वाटतें.

प्राणप्रयाणाचे वेळीं साधक मुमुक्षु जीवास अत्यंत कष्ट होतात म्हणून हे दोन सुंदर योगमार्ग शोधून काढिले. पण जरी प्राणप्रयाणाचे वेळीं अकस्मात प्रारब्धवशें करून कोणाचे वांट्यास कोणता मार्ग येतो हें निश्चित नाहीं तरी सुद्धां याच मार्गानें देह ठेवून वस्तु (ब्रह्मरूप) व्हावयाचें कीं काय ? सोऽहं सिद्ध पूर्ण योगी यांना या मार्गाचें ज्ञान असतें. ते या मार्गाच्या नादीं कधींच लागत नाहींत. व कोणत्या मार्गानें देह ठेवावा याचा भ्रम किंवा मोह त्यांना कधींच पडत नाहीं. देह राहो अथवा जावो, आम्ही मूळचेच वस्तुरूप (ब्रह्मरूप) आहोंत अशी त्यांची दृढभावना व दृढाभ्यास असतो, इतकेंच नव्हे तर तदनुरूप त्यांचें दृढाचरण व वर्तनसातत्य असतें.

दिवा किंवा प्रकाश या मार्गानें मजकडे आले तरच माझा सर्पपणा नष्ट होतो, नाहीं तर नाहीं, असें दोरीस कधीं वाटतें काय ? तिला तें कधींच वाटत नाहीं व वाटणारही नाहीं. हा तिजकडे अंधारांत पाहणाऱ्या अज्ञान जीवाचा भास आहे. कोणत्याही स्थितींत ती दोरीच असणार.

मला तरंगपण आहे कीं नाहीं हें पाण्याला कधींच भासत नाहीं व भासणारही नाहीं. तरंग (लाट, कल्लोळ) हा पाहाणाराच्या अज्ञान दृष्टीचा आभास आहे. कोणत्याही स्थितींत पाणी (तरंग, लाट, बुडबुडा, भोंवरा वगैरे वगैरे) हें पाणीच असणार. अमक्या मार्गानें मजकडे आलें तरच मी पाणी नाहीं तर नाहीं असें पाण्याला कधीं वाटतें काय ? त्याला तें कधींच वाटत नाहीं. तरंगामुळें पाण्याला कधीं स्वतंत्र जन्म येत नाहीं, किंवा तरंग लोपामुळें पाणी कधीं कालवश होत नाहीं.

त्याप्रमाणें देहांत असतांना देहासकट जे सोऽहंसिद्ध पूर्ण योगी वस्तुरूप झाले, जे देशकालादि सर्व तेच झाले, ज्यांच्या ठिकाणीं आतां देहाचें भान (मागमूस पत्ता, भिन्नभाव) उरलें नाहीं, ते कोणत्या कालीं व कोणत्या मार्गानें शरीर ठेवावें. हे मार्ग शोधण्याची नसती उठाठेव करतात कशाला ?

असें पहा कीं, जेव्हां घट ( मडकें, घडा ) फुटतो तेव्हांच कां त्यांतील आकाश महदाकाशास मिळतें, नाहीं तर चुकतें कीं काय ? घट फुटला म्हणजे विवक्षित आकाराचा किंवा उपाधीचा लोप होतो इतकेंच. वास्तविक पाहतां घटाकाश, मठाकाश व महदाकाश हें त्यांना उपाधि किंवा आकार मिळण्याचे पूर्वीं जेथें व जसें होतें तसेंच तें उपाधिलोपानंतरहि आहे.

अशा सुंदर ज्ञानानें त्या पूर्ण सोऽहंसिद्ध योग्यास मार्ग व अमार्ग ( अर्चिरादि व धूम्र ) यांचा भ्रम कधींच पडत नाहीं. ते वाटेल तेव्हां व वाटेल त्या मार्गानें जन्म घेतील व वाटेल तेव्हां व वाटेल त्या मार्गानें देह ठेवतील. त्यांना दक्षिणायनाची किंवा धूम्र मार्गांतील इतर योगांची अडचण नाहीं.

मग वाटेल त्या ठिकाणीं, वाटेल त्या कालीं, देहबंधन असो अथवा नसो, त्या सोऽहंसिद्ध पूर्ण योग्याच्या अनिर्बंध शाश्वत ब्रह्मभाव स्थितींत बिघाड येत नाहीं. तो कल्पाचे प्रारंभीं जन्माच्या तडाख्यांत सांपडत नाहीं. कल्पाचे शेवटीं मरणानें जलप्रलयांत बुडत नाहीं. व जन्ममृत्यूच्या मधल्या स्थितींत स्वर्गसंसारसुखाभासानें फसतही नाहीं. अशा ज्ञानानें जो योगी किंवा सिद्ध होतो त्यालाच या बोधाच सरळपण, वर्मरहस्य कळतें. कारण तो या सर्व स्वर्गसंसारभोगांना स्वस्वरूप सुखानंदाशीं तोलून पाहतो व स्वर्गसंसारभोग क्षणैक व असार आहेत असें पूर्ण अनुभवांतीं समजून, त्यांचा त्याग करून सोऽहंसिद्ध जी निजस्थिति त्याच स्थितीचा स्वीकार करतो. इंद्रादि देवांचीं ऐश्वर्यें अत्यंत सुखानंदाची म्हणून जिकडे तिकडे जीं गाजलीं असतात तीं निजात्मस्थितिसुखानंदापेक्षां सर्वस्वीं हिणकस अतएव त्याज्य आहेत असें मानून त्यांचा धिःकार करतो.

अशा सोऽहंसिद्ध पूर्ण योगी बाबांना, ज्ञानेश्वर महाराजांना अथवा निवृत्तिनाथ महाराजांना प्राणप्रयाणाचे किंवा समाधिकालाचे वेळीं दक्षिणायनाची अडचण कशी भासणार ? ती अडचण योगभ्रष्टांना सिद्धांना नव्हे. श्री ज्ञा. अ. ८ श्लो. २७ वरील भाष्य ओं. २४७ ते २६० पहा.

याप्रमाणें भगवान श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं बाबांच्या दक्षिणायनांतील समाधिकालाचें सांकडें फेडून, योगाभ्यास करणाऱ्या मुमुक्षु भक्तजनांकरतां त्यांतील रहस्यही प्रगट केलें आहे.

असो. ज्यांच्या दिव्य प्रेरणेनें ही वाङ्मयी सेवा करण्याची स्फूर्ति झाली त्या विश्वसंभव, विश्वंभर, विश्वाधार विश्वसंहारक साईमाउलीचे आंघ्रिपंकजावर ही अष्टादश वाङ्मयी कुसुमांजलि अनन्यभावें व प्रेमादरानें समर्पण करून प्रिय वाचकवृंदाची रजा देतों.

संतपदधुलिरज—कण दासानुदास,

**बाबांचें बाळ**

## श्रीसाईबाबा.

श्रीसाईबाबा शिरडी संस्थान कमिटीची सभा शिरडी येथें दीक्षित वाड्यांत गुरुवार तारीख ३१ माहे डिसेंबर सन १९४२ रोजीं दुपारीं २ वाजतां भरली होती त्या सभेचें टिपणः—

### हजर सभासदांचीं नांवें

१. रा. ब. मो. वि. प्रधान.
२. श्री. व. ना. गोरक्षकर.
३. रा. सा. य. ज. गाळवणकर.
४. श्री. र. भा. पुरंदरे.
५. श्री. द. दा. रासने.
६. श्री. तात्याजी गणपत पाटील कोते.

सं. कमिटीचे चेअरमन रा. ब. मो. वि. प्रधान यांचे अध्यक्षतेखालीं सभेच्या कामास सुरवात होऊन पुढीलप्रमाणें कामें उरकण्यांत आलीं:—

ठ. नं. १. गेले ता. २०।१०।१९४२ चे सभेचें टिपण सर्वांनुमतें मंजूर करण्याचें ठरलें व त्यावर अध्यक्षांची सही झाली.

ठ. नं. २. अजेंडा कलम १—ह्या बाबतींत खालीं लिहिल्याप्रमाणें ठराव सर्वांनुमतें मंजूर झाला.

१. रा. रा. रा. वा. धैसास ह्यांनीं शिरडी संस्थानचे खजिनदारीच्या जागेचा दिलेला राजीनामा स्वीकारण्यास कमिटी कबूल आहे. परंतु ज्या अर्थीं ता. ३१।१२।१९४२ पर्यंत रा. धैसास हे शिरडी संस्थानचे खजिनदार आहेत त्या अर्थीं संस्थानचे १९४२ चे हिशोब ऑडिटरकडून तपासून पास होईपर्यंत त्यांचा राजीनामा स्वीकारतां येत नाहीं व रा. धैसास ह्यांनीं त्यांचेकडील संस्थानचे हिशोब संस्थानचे ऑडिटरकडून तपासून घेण्याचें काम चालू आहे तें पुरें करून घ्यावें. ता. १।१।१९४३ पासून रा. धैसास ह्यांनीं संस्थानचे खजिनदाराचें काम पाहूं नये, व संस्थानचे पैशाची देवघेव कोणत्याही प्रकारें करूं नये. ती कामें ता. १।१।१९४३ पासून संस्थानचे दुय्यम खजिनदार रा. रा. दाजी विठ्ठल सांबारे ह्यांचेकडे सोंपविलीं आहेत व त्यास त्यांची कबुली आहे. ता. १।१।१९४३ नंतर रा. धैसास ह्यांचेकडे संस्थानच्या वर्गण्या वगैरे आल्यास त्या त्यांनीं स्वीकारूं नयेत व त्या त्यांनीं रा. सांबारे यांचेकडे पाठविण्याची तजवीज करावी. रा. धैसास ह्यांचेकडे संस्थानची पावतीबुकें, चेकबुकें, बँकबुकें व इतर कांहीं कागद असल्यास तीं त्यानें रा. सांबारे ह्यांचेकडे द्यावींत.

२. ज्या अर्थी रा. धैसासच्या खजिनदारीच्या जागेचा राजीनामा वर नमूद केल्याप्रमाणें स्वीकारतां येत नाहीं त्या अर्थी संस्थानचे कमिटीच्या सभासदत्वाचा राजीनामा तूर्त स्वीकारतां येत नाहीं.

३. रा. धैसास ह्यांनीं श्रीसाईलीला मासिकाच्या संपादकत्वाचा (एडिटरशिपचा) दिलेला राजीनामा कमिटी ता. १।१।१९४३ पासून स्वीकारीत आहे व त्याचे जागीं रा. रा. श्रीधर नारायण खारकर संस्थानचे ऑनररी सेक्रेटरी, ह्यांची नेमणूक केली आहे. रा. धैसास ह्यांनीं श्रीसाईलीलेचे संपादक ह्या नात्यानें वेळोवेळीं संस्थानास जी मदत केली आहे त्याबद्दल संस्थान त्यांचे फार आभारी आहे.

ठराव मांडणार—रा. रा. द. दा. रासने.

अनुमोदन देणार—रा. रा. तात्याजी ग. पाटील कोते.

ठ. नं. ३. अजेंडा कलम २—ह्या बाबतींत खालीं लिहिल्याप्रमाणें ठराव सर्वानुमतें मंजूर झाला.

"The whole clause (g). of Rule No 23 of Shirdi Sansthan Rules should be substituted as under—

(g) To keep a public account in the Postal Savings bank to be operated upon either by he Hon. Treasurer and one of the Trustees, or by the Hon. Secretary and one of the Trustees as the Committee deems fit to do."

(2) The Secretary is authorised to give effect to this arrangement as regards the operation on the existing public account in the Postal Savings Bank at the Thana post office by carrying out the necessary correspondence with the postal Authorities concerned.

ठराव मांडणार—रा. रा. र. भा. पुरंदरे.

अनुमोदन देणार—रा. सा. य. ज. गाळवणकर

ठ. नं. ४. अजेंडा कलम ३—रा. रा. रासनेंचेकडे भांडीं खरेदीचें काम सोंपविलेले बाबतींत त्यांनीं खुलासा केल्यावरून त्यांचे मार्फतचे खरेदीचे बिल अदमासें रु. ४३५ सन १९४२ चे सालांत चुकतें करण्याचें सर्वानुमतें ठरलें

सर्वानुमतें मंजूर.

ठ. नं. ५. अजेंडा कलम ४—सध्यांच्या परिस्थितीमुळें ह्या बाबतींत विचार न करण्याचें सर्वांनुमतें ठरलें.

सर्वांनुमतें मंजूर

अध्यक्षांचे परवानगीनें खालील ठराव सर्वानुमतें मंजूर झाला:—

ठ. नं. ६. " This Committee resolves that the amount at present lying in the Current Account of the Imperal Bank of India should pe invested in Govt. Paper . to the extent of face value of Rs. 7,000."

ठ. नं. ७. खालीं लिहिल्याप्रमाणें श्रीमंत के. जी. बुटी यांचे ता. १७।१२।१९४२ च्या पत्रास उत्तर देण्याचे सर्वानुमतें मंजूर झाले:—

" the Sansthan is prepared to take over the honorary supervision of the upper floor of the Samadhi Mandir in the sense that they will hold the custody and carry out the cleaning and ordinary white washing. But as the present condition of the said upper floor is such as requires immediate repairs and oil painting, if for nothing else then at least for the sake of the preservation of the deteriorating wooden Structure all round. Shrimant K. G. Booty is therefore requested to let the Sansthan know as to how he proposes to meet the said requirement. The Sansthan regrets that they cannot agree to take over the honorary supervision of the upper floor in absence of definite information on this point."

ठ. नं. ८. भक्तमंडळाचे साधारण सभासदासाठीं १२ भक्तांचे व तहहयात सभासदांसाठीं २ भक्तांचे आलेले अर्ज सर्वांनुमतें मंजूर करण्यांत आले.

सर्वांनुमतें मंजूर

ठ. नं. ९. चालू परिस्थितींत संस्थानांत रात्रीचे पहाऱ्यांची जरूरी वाटल्यामुळें ऑक्टोबर महिन्यापासून प्रथम संस्थान नोकरांपैकीं दोन दोन इसमांच्या

दोन जोड्या, प्रत्येक इसमास मासिक आलावन्स रुपये दोन देऊन रात्रीचे पहाऱ्याची योजना चिटणीस यांनीं केली होती. परंतु संस्थान नोकरास रात्रीचे पहाऱ्याचें काम करून दिवसा काम करणें गैरसोयीचें होतें असा अनुभव आल्यावरून स्वतंत्र पहारेकरी नोकर नेमण्याची जरूरी पडली. अशा कामावर पोलिस खात्यांतील एक पेन्शनर इसम मिळाल्यामुळें त्याची नेमणूक डिसेंबर महिन्यापासून केली आहे व त्यास तूर्त दरमहा वेतन रु. १० ते ११ देणेंचें ठरविलें आहे. ही योजना ही सभा सर्वानुमतें मंजूर करिते व या पहारेकऱ्यास दरमहा पगार लायकीप्रमाणें रु. १० ते १२ देणेस चिटणीस यांस अधिकार देते.

यानंतर अध्यक्षांचे आभार रा. रा. व. ना. गोरक्षकर यांचे सूचनेवरून मानण्यांत येऊन कमेटीचें काम संपविण्यांत आलें.

ऑ. चिटणीस,
**श्रीसाईबाबा शिरडी संस्थान.**
**ता. ३१-१२-४२**

अध्यक्ष
**मो. वि. प्रधान**

---

श्रीसाईनाथ प्र०

# डिसेंबर १९४२ चें शिर्डीवृत्त

या महिन्यांत मुंबई, पुणें, ठाणें, नाशिक, नगर, हैद्राबाद, सिकंदराबाद, औरंगाबाद, बेळगांव, धुळें, जुन्नर, रामनगर, कुंभकोणम्, मायावरम्, धर्मावरम्, त्रिवाळूर, कडप्पा, मद्रास, म्हैसूर, बेंगळूर, ताडपत्री, तंजावरम्, सेलम्, गुंडकल, वेल्लोर, अलीबाग, अरनाळा, महू, डहाणू, बोलाराम्, अंधेरी, एडगांव, विरार, वगैरे गांवांहून बरेच भक्त श्रींचे दर्शनास आले होते.

## देणगी

( श्रीसाईनाथ मंडळ वेल्लोर ) कडून दोन रेशमी जरीकाठी उपरणी अर्पण, हस्ते श्री. सी. चक्रवर्ति वकील, वेल्लोर.

श्री. विश्वनाथ मुकुंदराव कोठारे, सोनव्हिला घोडबंदर रोड, खार-मुंबई ——ची जरीकाठी बनारसी रेशमी शेला अर्पण,

सौ. कलाबाई रघुनाथ चांदोरकर लक्ष्मणवाडी शुगर कं., शिर्डी, पितळी लहान निरांजनें चार अर्पण.

धर्मकृत्य ( अभिषेक, अर्चन, ) ( नैवेद्य. सु. ब्रा. ) दरमहाप्रमाणें याही महिन्यांत अभिषेक लघुरुद्र, विष्णूसहस्र अर्चन, नैवेद्य, ब्राह्मण सुवासिन भोजन, वगैरे धर्मकृत्यें बरींच झालीं.

## कीर्तनें

संस्थान गवई यांची कार्तिक वद्य एकादशी, श्रीज्ञानेश्वरपुण्यतिथि, मार्गशीर्ष शुद्ध एकादशी, श्रीदत्तजयंती, भक्तमंडळींचेकरितां एक कीर्तन, अशीं पांच कीर्तनें झालीं.

## नवलविशेष

श्रीदत्तजयंतीप्रित्यर्थ श्री. पादुकावर अभिषेक कीर्तन भोजन असें झालें.

श्री. डॉ. मधुसूदन भगवंत गव्हाणकर, मुंबई, यांचे श्रीमंदिरांत मित्रमंडळींसह संगीत भजन झालें.

श्री. एस. के. तीर्थ. तंजावर ( घटवाद्य ) वादन श्रीमंदिरांत झालें.

श्री. सौ. जंपकलक्ष्मी. त्रिवाल्लूर, जि. तंजावर. या मद्रासी बाई शिर्डीस चार पांच दिवस होत्या. यांनीं श्रीसाईबाबांचेबद्दल तामीळ भाषेंत पुष्कळशीं पदें रचलेलीं आहेत, श्रीमंदिरांत स्वतः रचलेलीं पदें म्हणून भजन केलें. या बाई अन्न खात नाहींत, लिंबाचें सरबत मात्र घेतात. यांची वृत्ती फारच सात्विक प्रेमळ होती.

( क्ष ) बाई भक्त यांचेंही श्रीमंदिरांत शास्त्रोक्त गायन झालें.

यंदाचे सालीं नाताळ सुट्टींत मद्रासकडील भक्तमंडळी चालू परिस्थितीमुळें फारशी आली नाहींत.

संस्थानकमेटीची ज. मिटिंग ता. ३१।१२।४२ रोजीं झाली.

शिर्डीचें हवापाणीः—या महिन्यांत ४।५ दिवस बराच पाऊस पडला.

आपला नम्र,

**विठ्ठल य. मराठे.**

# अनुभव

## १

श्री. डॉक्टर के. एन्. श्रीनिवासन् ५९ गवीपूर बसवन गुठी बेंगलूर यांचा:—

मी कुटुंबांतील मंडळींस न सांगतां वाटखर्चास व इतर खर्चास कांहीं पैसे घेऊन शिर्डीस श्रीसाईबाबांचे दर्शनास ता. १९।१।४२ रोजीं आलो. शिर्डीस तीन दिवस राहिलों. श्रींचे समाधीवर अभिषेक, विष्णुसहस्र तुलसी अर्चन, नैवेद्य असें धर्मकृत्य करून श्रींची उदीप्रसाद घेऊन पंढरपुरास गेलों. श्री. विठ्ठल गहिनाथ बडवे यांचे घरीं उतरलों. पंढपुररास श्रीस तुलसी अर्चन, अभिषेक, नैवेद्य, ब्राम्हण, सुवासिन वगैरे धर्मकृत्य केलें. श्री. विठ्ठल बडवे यांना दक्षिणा देणेसाठीं पैशांचें पाकीट उघडून पाहतों तों त्यांत पै सुद्धां नाहीं. पाकीट रिकामें. कोणी पैसे काढून घेतले म्हणावे तर पाकीट कमरेला घट्ट बांधलेलें. मनाला फार काळजी लागली. आतां कसें करावे. येथें आपणाला उसने पैसे कोण देईल असा विचार करीत सचिंत बसलों. बडवे यांनीं विचारलें, आपण फार काळजींत दिसतां. मी म्हणालों होय. विठ्ठल, माझे पाकिटांत पैसे होते पण आतां त्यांत कांहीं नाहींत. पैसे कसे नाहीसें झाले याचा मला कांहींच उलगडा होईना. येथें मला कोणी पैसे दिल्यास मी घरीं गेल्याबरोबर मनिआर्डरनें पाठवून देईन. बडवे म्हणाले, मी थोड्या वेळानी तुम्हास काय तें सांगतों. असें म्हणून थोडया वेळानीं विठ्ठल बडवे यांनीं दोन रुपये मात्र आणून दिलें. आतां हे दोन रुपये घरीं जाण्यास पुरणार कसे असा विचार करूं लागलों इतक्यांत जवळच रेल्वे गाईड पाहूं लागलों. इतक्यांत एक विचार सुचला. कोल्हापुरास लॉ कॉलेजांत बेंगलूरचे कांहीं विद्यार्थी आपले परिचयाचे आहेत तेव्हां त्यांना भेटून वाटखर्चास पैसे उसने घ्यावे असा विचार करून रेल्वे गाईड पाहिलें तों कोल्हापुरास पंढरपुराहून दोन रुपये सव्वा आठआणे चार्ज पडतो. आतां विठ्ठल बडवे यांनीं दिलेले दोन रुपये आहेत सव्वाआठ आणे पाहिजेत, म्हणून पुन्हा पाकीट उघडून पाहूं लागलों तों त्यांत फक्त सव्वाआठ आणेच दिसले. ते पाहून आश्चर्य वाटलें व रात्रीचे गाडीनें कोल्हापुरास निघालों. ता. २५।१।४२ रोजीं सकाळीं कोल्हापुरास उडपी हॉटेलांत उतरलों. स्नान वगैरे करून श्री. अंबाबाईचे दर्शनास गेलों. श्री. जगदंबादेवीस लक्ष्मी कुंकुमअर्चन केलें व पुन्हा बिऱ्हाडीं परत आलों, भोजन केलें. रेल्वे गाईड पाहूं लागलों तों कोल्हापूर ते बंगलूर आठ रुपये आठ आणे चार्ज पडतो. देवीस अर्चन केलें तो व भोजनखर्च मिळून साडेनऊ रुपये लॉ कॉलेजांत जाऊन मागून आणावे म्हणून [illegible] एकदां पैशाचें पाकिट उघडून बघावें म्हणून पाकीट उघडून

पाहतों तों त्यांत साडेनऊ रुपये होते. वेड लागल्यासारखें झालें. मनांत म्हणालों, बाबा ही काय जादू आहे ! तावडतोब डोळ्यावाटे आनंदाश्रू आले. मग लौकरच बेंगलुरास निघालों. रात्रीं मेलमध्यें खूपच गर्दी. थोड्या वेळानें एक मनुष्य वरील बांकावर निजला तो उतरून गेला. मी त्या जागीं जाऊन निजलों. झोंपही चांगली लागली. हरिहर स्टेशनला जागा झालों. सकाळची वेळ स्टेशनवर उतरून शौचमुखमार्जन आटोपलें व पुन्हां गाडींत बसलों तों बेंगलुरास पोहोंचलों. स्टेशनवर टांगा करून घरीं गेलों व घरांतील मंडळीस टांगेवाल्यास पैसे देणेस सांगितलें. घरांत जाऊन कोट काढूं लागतों तों कोटांतून खळखळ असा अवाज होऊन दोन रुपये खालीं पडले. हे रुपये पाहून मग सर्व हकीगत घरांतील सर्व मंडळीस आनंदानें सांगूं लागलों. हे दोन रुपये विठ्ठल गहिनाथ बडवे यांनीं पंढरपुरास दिलेले ते परत मनिऑर्डरनें पाठवून दिले.

---

## २

### मि. एस. आर. एकंबरम्, बी. ए. बी. एल. वकील, सीकंदराबाद.

हे गृहस्थ शिर्डीस श्रीचे दर्शनास आले. त्यावेळीं चार दिवस शिर्डीत राहून जातांना चिटणीस यांची मुद्दाम भेट घेऊन पुढीलप्रमाणें आपला अनुभव सांगून गेले:—

